निवडणूक-तात्काळ
ई-मेलद्वारे

> माहे जानेवारी-फेब्रुवारी २०१८ या कालावधीत मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने अस्तित्वात आलेल्या व विघटीत ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी राबविण्यात यावयाच्या मतदार यादीच्या सुधारीत कार्यक्रमात अंशत: बदल.

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक : रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.०६/का-८
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- १४ नोव्हेंबर, २०१७

**प्रति,**
**जिल्हाधिकारी (सर्व),**
*(मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा वगळून).*

**विषय :- माहे जानेवारी-फेब्रुवारी २०१८ या कालावधीत मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने अस्तित्वात आलेल्या व विघटीत ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी राबविण्यात यावयाच्या मतदार यादीच्या सुधारीत कार्यक्रमात अंशत: बदल.**

**संदर्भ :-** १) आयोगाचा क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१७/प्र.क्र.१/का-८, दिनांक ०१.०६.२०१७ रोजीचे प्रभाग रचना व आरक्षणाच्या कार्यक्रमाबाबतचे आदेश.
२) आयोगाचा समक्रमांकाचा दि.०६.११.२०१७ रोजीचा मतदार यादीचा सुधारीत कार्यक्रम.

महोदय/महोदया,

आयोगाच्या संदर्भ क्रमांक २ अन्वये, माहे जानेवारी-फेब्रुवारी २०१८ या कालावधीत मुदती संपणाऱ्या तसेच नव्याने अस्तित्वात आलेल्या व विघटीत ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी देण्यात आलेल्या मतदार यादीच्या सुधारीत कार्यक्रमात, तांत्रिक कारणांमुळे अंशत: बदल करण्यात येत असून सुधारीत बदल खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | मतदार यादी कार्यक्रमातील टप्पे | टप्प्याची सुधारीत तारीख |
|---|---|---|
| १ | प्रभागनिहाय प्रारूप **मतदार यादी** प्रसिध्द करण्याचा दिनांक | मंगळवार दि. १४.११.२०१७ ऐवजी<br>गुरुवार दि. १६.११.२०१७ |
| २ | हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | गुरुवार दि. १६.११.२०१७ ते<br>मंगळवार दि.२१.११.२०१७ पर्यंत<br>**(रविवार दि. १९.११.२०१७ रोजी हरकती व सूचना स्विकारण्यात याव्यात.)** |

तसेच दिनांक ०६.११.२०१७ रोजी आयोगाने निर्गमित केलेल्या मतदार यादीच्या सुधारीत कार्यक्रमात नमूद केल्याप्रमाणे **अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्याचा दिनांक २४.११.२०१७ हाच राहील.**

तरी वरील बदलाबाबत आपल्या अधिनस्त अधिकारी व कर्मचारी यांना तातडीने अवगत करावे. हा कार्यक्रम राबविताना आयोगाच्या संदर्भ क्रमांक २ च्या मतदार यादीच्या सुधारीत कार्यक्रमाबाबतच्या आदेशातील सर्व संबंधित सूचनांचे यथोचित पालन करण्यात यावे व मतदार यादी कार्यक्रमाचा टप्पानिहाय अहवाल आयोगास सादर करण्यात यावा.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपली,

14.11.17

(आरती सरवदे-आहेर)
तहसिलदार,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र